# जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
# ( तलाठी पद भरती-२०१६ च्या कामाबाबत )
# अल्प मुदतीची निवीदा सुचना

---

जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समिती अंतर्गत लिपीक टंकलेखक / तलाठी संवर्गातील पद भरती अंतर्गत खालील संगणकीय कामासाठी इच्छुक एजन्सीकडून निवीदा मागविण्यात येत आहे.

१. लेखी परिक्षेकरीता OMR (Carbonlss Optical Mark Reader Sheet) उत्तरपत्रिका छपाई करणे, केंद्रनिहाय (२४ - २४ प्रमाणे) राखीव पाकीटासह पुरविणे.

२. उमेदवारांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिकांची OMR मशिनद्वारे तपासणी करुन बैठकक्रमानुसार निकाल तयार करुन देणे.

३. निवीदा फॉर्म तसेच अटी व शर्ती मध्ये नमुद कामाच्या व्यतिरिक्त भरती प्रक्रीये करीता आवश्यक असलेले कोणतेही काम जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार करावे लागेल.

४. निवीदाधारकाकडे उपलब्ध सॉप्टवेअरचे प्रात्यक्षीक जिल्हाधिकारी यांचे समोर सादर करावे लागेल त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्व निवीदाधारकांना बंधनकारक राहील.

(अ) इच्छुक संगणक एजन्सीने वरील सर्व कामाकरीता प्रती अर्ज असलेले दरासह निवीदा अर्ज २९/०८/२०१६ ते दिनांक ३१/०८/२०१६ पर्यंत दुपारी २.०० वाजपर्यंत (शासकिय सुटीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत रु. ५००/- रोख भरुन विक्रीस आस्थापना शाखेमध्ये उपलब्ध राहील व दि. ३०/०८/२०१६ ते ०१/०९/२०१६ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत निवीदा निवड समितीच्या कार्यालयात स्विकारण्यात येतील. प्राप्त निवीदा दि. ०२/०९/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता निवड समितीच्या कार्यालयात उघडण्यात येतील.

(ब) निवीदा, अटी व शर्ती निवीदा अर्जासोबत दिलेल्या आहेत.

(क) निवीदा दोन / लिफाफे पध्दतीनेच भरावे लागतील.

## <u>लिफाफा क्रमांक १ तांत्रिक निविदेचा लिफाफा</u>

सदर लिफाफयावर अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, बुलडाणा अंतर्गत तलाठी संवर्गातील पद भरती कामाबाबत तांत्रिक लिफाफा असे लिहावे.

**लिफाफा क्रमांक १ मध्ये खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे.**

१. संगणक एजन्सीला असलेले शासन मान्य प्रमाणपत्र

२. फक्त राष्ट्रीयकृत बँकेचा अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे नावाचा अनामत रक्कम रुपये ५०००/- चा धनाकर्ष

३. आयकर भरल्याबाबतचे प्रमाणपत्र / पुरावा

४. सर्व्हर / संगणक /प्रिंटर स्कॅनर /OMR साप्टवेअर उपलब्धतेबाबत तपशिलवार माहिती

५. शासकिय /निमशासकिय कार्यालये, विभागामध्ये भरती प्रकियेसाठी OMR उत्तरपत्रिका छपाई, तपासणी करणे, निकाल जाहीर करण्याचा अनुभव असल्याची कागदपत्रे उदा. कामाचे आदेश, प्रमाणपत्र ईत्यादी कागदपत्रे निवीदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.

वरील सर्व प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्य प्रती लिफाफा क्रमांक १ मध्ये सादर कराव्यात. मात्र निवीदा उघडण्याच्या वेळी लिफाफा क्रमांक १ मध्ये सादर केलेल्या सर्व मुळ प्रमाणपत्रे निवीदा उघडतेवेळी निवीदा धारकांनी पडताळणीसाठी स्वत:जवळ ठेवणे आवश्यक राहील.

**लिफाफा क्रमांक २ व्यापारिक / दरासबंधीचा लिफाफा (प्राईस टेंडर फॉर्म)**

सदर लिफाफयावर अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, बुलडाणा अंतर्गत तलाठी संवर्गातील पद भरती व्यापारिक लिफाफा असे लिहावे.

या लिफाफयामध्ये उपरोक्त नमुद कामाकरीता प्रती OMR छपाईचे दर तसेच तपासणीचे दर स्वतंत्रपणे नमुद करावे. दर नमुद करण्याचे आधी निवीदेच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचाव्यात.

लिफाफा क्रमांक १ अगोदर उघडला जाईल त्यामध्ये विहीत कागदपत्रे नसतील तर लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येणार नाही म्हणजेच ती निवीदा नामंजुर समजण्यात येईल.

निवीदा उघडण्याची तारीख व वेळ तसेच निवीदेतील कोणतीही अट शिथील करण्याचे बदविण्याचे अथवा रद्द करण्याचे अधिकार कार्यालयाने राखुन ठेवलेले आहेत.

दि.२३ ऑगस्ट २०१६

स्वाक्षरी/-

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष

जिल्हा निवड समिती ,बुलडाणा

अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे कार्यालय,
( तलाठी पद भरती - २०१६ च्या कामाबाबत अल्प मुदती निविदा सुचना)
अल्प मुदतीची निवीदा सुचना

**अटी व शर्ती**

१) कंत्राटाचा कालावधी हा दिनांक २३/०८/२०१६ पासुन निवड प्रक्रीयेचे काम प्रत्यक्षात संपेपर्यंत अंमलात राहील.

२) निवड प्रक्रीयेच्या कामाचे आदेश जिल्हाधिकारी अथवा ते ज्या सक्षम अधिकाऱ्यांना प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यांनी स्पष्ट आदेश दिल्यापासून यासबंधीची कामे अपेक्षीत राहील, अन्यथा करारनामा संपुष्टात येईल.

३) निवीदेसोबत अनामत रक्कम रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त ) जिल्हाधिकारी, बुलडाणा या नावाने धनाकर्ष (डी.डी) व्दारे जमा करावी लागेल.

४) निवीदा धारकांना राष्ट्रीयकृत बॅकेंची गॅरंटी रुपये ५००००/- ( अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) सबंधी हमीपत्र (सी.डी.आर) करारनाम्याचे वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

५) कंत्राटदार यांनी निवीदा सादर करतेवळी निवीदा प्रपत्रात नमुद केलेल्या तपशिल नुसार कामाचा नमुना उपलब्ध करुन द्यावे व त्यानुसार कामाचा दर्जा कायम राखणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

६) वरील काम हे निवीदेच्या अटी व शर्ती प्रमाणे केले, याबाबत सक्षम अधिकारी यांनी प्रमाणपत्र दिल्याशिवाय कंत्राटदार यांना देयकाची अदायगी करण्यात येणार नाही.

७) निवीदा प्रमाणे काम करतांना यासंबंधी कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास त्यासबंधी सक्षम अधिकारी यांचेकडून चौकशी करण्यात येईल. त्यामध्ये निवीदा धारक दोषी आढळुन आल्यास करारनामा तात्काळ संपुष्टात येईल.

८) कामाच्या नमुन्यानुसार उमेदवारांना द्यावयाची OMR उत्तरपत्रिका त्यावरील मजकुर व कार्यालयास वेळोवळी द्यावयाची माहिती ही स्पष्ट व निटनेटकी राहील याची खबरदारी घ्यावी लागेल.

९) निवीदेप्रमाणे काम करतांना कंत्राटदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांना होणाऱ्या नुकसानीबाबत जसे - अपघात, आग लागणे, भाव वाढ, इतर नैसर्गीक अथवा मानव निर्मीत आपत्तीमुळे कंत्राटदाराच्या होणाऱ्या कुठल्याही नुकसानीबाबतची भरपाई कंत्राटदाराला दिली जाणार नाही.

१०) निवीदामध्ये दर्शविलेल्या ठिकाणी या सबंधी सर्व रेकॉर्ड सुरक्षीत व गोपनिय राहील याची वेळोवेळी खबरदारी घ्यावी.

११) पद भरती प्रक्रीयेचे कामामधुन उपलब्ध माहिती, आकडेवारी, विश्लेषन इत्यादीचा परस्पर वापर अथवा विल्हेवाट निवीदाधारकाला स्वत:साठी किंवा इतरांसाठी करता येणार नाही.

१२) कामाचे कालबध्द कार्यक्रमात कंत्राटदाराचे चुकीमुळे विलंब अथवा बाधा निर्माण झाल्यास प्रती दिन रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) किंवा जिल्हाधिकारी निश्चित करतील त्यानुसार दंड आकारुन वसुल करण्यात येईल.

१३) कामासबंधी ठेवावयाचे लेखे, रोजनिशी, विवरणे व पत्र व्यवहाराचे स्वरुप हे सक्षम अधिकारी निश्चित करुन देतील त्यानुसार कार्यवाही करावी लागेल.

१४) काम असमाधानकारक आढळुन आल्यास मंजुर निवीदानुसार दिलेले काम अथवा कामाचा काही भाग काढुन घेण्याचा अधिकारी जिल्हाधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.

१५) निवीदेतील अटींचा भंग केल्यामुळे अथवा निवीदाधारकाचे गैरकृतीमुळे निवीदाधारक यांच्याकडून काम काढुन घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना असुन सदर काम हे दुसऱ्या कंत्राटदाराकडून करुन घेतले जाईल. त्याप्रित्यर्थ मंजुर निवीदेपेक्षा जास्तीचा खर्च व फरकाची रक्कम व आकारलेल्या दंडाची रक्कम ही मुळ कंत्राटदाराकडून वसुल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

१६) ज्याची निवीदा स्विकृत करण्यात येईल त्या कंत्राटदारास रुपये १००/- (रुपये शंभर फक्त) चे स्टॅम्प पेपरवर तात्काळ करारनामा विहीत नमुन्यात द्यावा लागेल. करारनामा जरी केला असला तरीही कारण न देता करार रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना राहील.

१७) कंत्राटदारास भारतीय दंड संहितेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली असल्यास / काळ्या यादीत घोषीत केले असल्यास अशा कंत्राटदारांनी स्वत: अथवा त्यांचे नातेवाईकांचे नावाने निवीदा भरु नये, अशा कंत्राटदारांना देण्यात येणारी निवीदा रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

१८) निवीदाधारकाने निवीदामधील कोणत्याही अटीचा भंग केल्यास त्याची अमानत रक्कम जप्त करण्यात येईल व केलेल्या कामाचा मोबदला देय राहणार नाही.

१९) वरील अटी व शर्तीमध्ये फेरबदल करण्याचा, काही नविन अटी व शर्ती समाविष्ट करण्याचा तसेच काही अटी व शर्ती शिथील करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना स्वत:कडे राखुन ठेवलेला आहे.

२०) लेखी परिक्षेकरीता OMR (Carbonlss Optical Mark Reader Sheet) उत्तरपत्रिका दिलेल्या मुदतीमध्ये उपलब्ध करुन द्यावी लागेल.

२१) पदभरतीच्या उत्तरपत्रिका तपासण्याकरीता OMR सॉप्टवेअर/स्कॅनर व कर्मचारी उपलब्ध करुन द्यावे लागेल.

२२) सदर भरती प्रक्रीया कालबध्दरित्या पुर्ण होण्याकरीता आवश्यक मनुष्य बळ व साधन सामुग्री (संगणक/प्रिंटर/प्रिंटर कार्टेज/लेखनसामुग्री व इतर अनुषंगीक साहित्य) कंत्राटदारांना उपलब्ध करुन द्यावे लागेल. संगणक सामुग्री, प्रिंटर, कार्टेज, आवश्यक लेखन सामुग्री व इतर अनुषंगीक साहित्याकरीता वेगळी रक्कम अदा करण्यात येणार नाही. कंत्राटदारातर्फे नेमलेल्या कर्मचाऱ्यांची

यादी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी लागेल त्यापैकी कुणीही सदर भरती प्रक्रीयेमध्ये अर्ज केलेला नसावा.

२३) सदर भरती प्रक्रीयेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर कंत्राटदार किंवा त्याचे कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार, भ्रष्टाचार, नियमबाहय कामे, कृती, गैरवर्तणुक, चुकीच्या नोंदीमुळे गैरप्रकार केल्याचे आढळुन आल्यास अनामत रक्कम सरकार जमा करुन त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल व त्यांना काळ्या यादीमध्ये (Black list) टाकण्याची कारवाई करण्यात येईल.

२४) दिलेले काम असमाधानकारक असल्याचे आढळुन आल्यास किंवा निवीदेतील कोणत्याही शर्ती व अटींचा भंग केल्यास कोणतेही कारण न देता कंत्राटदारास दिलेले काम काढून घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

२५) संपुर्ण काम झाल्यानंतर देयक अदा करतांना शासनाचे सर्व प्रकारचे कर कपात करुनच रक्कम अदा करण्यात येईल.

२६) निवीदा फॉर्म तसेच अटी व शर्तीमध्ये नमुद कामाच्या व्यतिरिक्त भरती प्रक्रीयेकरीता आवश्यक असलेले कोणतेही काम जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार करावे लागेल.

***